# डॅडी

**मोहनतारा पाटील**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**डॅडी**

मोहनतारा पाटील

© **सुरक्षित**

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,

शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.

riyapublications@gmail.com

www.ajabgroup.com

**लेखिका**

मोहनतारा पाटील

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ ४५०/-

# डॅडी

# एक

ऋतुचक्र! हिवाळा, उन्हाळा, पावसाळा! पुन्हा पावसाळा, उन्हाळा, हिवाळा हे निसर्गाचं चक्र, असंच फिरत राहणारं. प्रत्येकानं आपल्या आयुष्याचा हिशेब यावरून लावायचा. किती उन्हाळे-पावसाळे आपल्या जीवनाचे सरले यावर सारे; त्यातले किती यशाने संपन्न झाले तर किती अपयशाने भरून गेले; किती स्वप्नं पूर्ण झाली, तर किती स्वप्नांचा चुराडा झाला; कशी गणती करायची? किती खंत, किती खेद यांनी रिते झालेले पावसाळे सरले. किती उरीपोटी जपलेली स्वप्नं आयुष्याच्या उन्हाळ्यांनी भाजून, पार कोळपून निघाली. हाती काय आलं? काय मिळवलं, काय गमावलं? विचारांचं वादळ घोंघावत होतं. सारा अंतर्बाह्य ढवळून निघाली होती....विचारांच्या आवर्तांनी.

सारा स्तब्धपणे बसलेली होती. तिच्याजवळ पडलेलं टंकलेखन यंत्र मूकपणे तिच्याकडे पाहात होतं, जणू तिच्या स्पर्शासाठी आतुर झालं होतं; पण साराची नजर....परिकथेत वर्णिलेल्या सुंदर दृश्याप्रमाणे खिडकीवाटे दिसणाऱ्या मोहक दृश्यावर रोखलेली होती. खिडकीवाटे दिसणाऱ्या निरभ्र आकाशाच्या निळाईमधून वर्षणारे बर्फाचे तुकडे झरझर खाली पडत होते. लांबवर पसरलेलं गवताळ मैदान आपली हिरवाई विसरून, बर्फाची पांढरी दुलई पांघरून पहुडलेलं होतं. वृक्षांना शेंड्यापासून फांद्यांच्या टोकापर्यंत बर्फाची किनार लाभली होती. काही वृक्षांवर बर्फ ओथंबून आला होता. बाहेरचं हे विलोभनीय दृश्य अन् आपल्या घरची माणसं, सारंच जणू एक परिकथा होती असं तिला वाटलं.

आपली माणसं! सारा त्यांच्यापैकीच एक होती पण....तिच्या कल्पनेतल्या माणसांपेक्षा ती सारीच वेगळी-आगळी होती. एक नव्हे, दोन नव्हे-चांगली वीस वर्षं ती त्यांच्यात मिसळून गेली होती. खऱ्या अर्थानं ती सौ. सारा ऑलिव्हर वॅटसन बनली होती; दुधात पाणी मिसळावं तितकी त्या वॅटसन कुटुंबियांच्यात संपूर्णपणे मिसळून गेली होती. देखण्या ऑलिव्हर वॅटसनची पत्नी, तीन मुलांची माता. यांचा सांभाळ करण्यात तिच्या आयुष्यातील गेले वीस उन्हाळे-पावसाळे सरले. या वीस ऋतुचक्रांच्या फेऱ्यांतून तिनं काय मिळवलं-काय गमावलं? सौ. सारा वॅटसन तिच्या समोरून पुसट होत गेली अन् तिच्या डोळ्यांसमोर तरळून गेली, ती कु. सारा मॅक्कार्मिक, बंडखोर, स्वमताग्रही,

जिद्दी, तितकीच प्रेमळ. १९६९ मध्ये रॅडक्लिफ येथे तिनं वृत्तपत्राची पदवी संपादन केली अन् संपूर्ण वर्गात ती प्रथम क्रमांकानं चमकली. त्यावेळी सर्वांकडून कोण कौतुक झालं आणि तिला कळून चुकलं, की खरंच, ती इतरांहून वेगळी आहे; तिचा जन्मच मुळी काही भव्यदिव्य मिळवण्यासाठी आहे. झालंही तसंच, तिनं 'क्रिमझन' या वृत्तपत्रांत उपसंपादिका म्हणून आपल्या भव्यदिव्य स्वप्नाप्रत वाटचाल सुरू केली. ती कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात असताना, एका प्रसंगी तिला ऑलिव्हर वॅटसन भेटला आणि स्त्रीसुलभ प्रेमोद्भव झाला. देखण्या ऑलीबद्दलच्या प्रेमाचा अंकुर मनातून खुरडून टाकण्याचा प्रयत्न करीत असतानाही, तिच्या मनात चिवटपणे तो फुटू लागला. तिला जाणवत होतं, की तिच्या ऑलीत जे होतं त्यापेक्षा ती फार वेगळी होती. तो तसा कर्मठ वृत्तीचा तर ती अगदी बेदरकार. व्हिएतनाममधल्या घटनांनी ऑलिव्हर व्यथित होई तर ती म्हणे, 'त्यात काय चुकलं? चालायचंच!' त्यामुळे साराला त्याचा फारच तिरस्कार वाटू लागला. परिणामत: मनातील प्रेमाची आर्तता कठोरपणे दडपून ठेवून, तिनं त्याला भेटण्याचं थांबवलं. प्रामाणिक अन् प्रेमी ऑलिव्हरला ते असह्य झालं, तेव्हा तिनं त्याला स्पष्टपणे बजावलं, 'आपल्या स्वभावात जमीन-अस्मानाचं अंतर आहे. त्यासाठी दूर राहणंच योग्य ठरेल.' हे दूरत्व राखण्यासाठी ती त्याच्यापासून लांब-न्यूयॉर्कमधील सोहो विभागात राहावयास गेली. तेथे लिखाणास प्रारंभ केला. त्या काळात मासिकातून तिचे लिखाण प्रसिद्ध होऊ लागले. अटलांटिक मासिक अन् न्यूयॉर्क यामधले लेख खूपच गाजले. आपण साहित्यात खूपच चांगले काम करू शकतो याची तिला खात्री पटली. ऑलिव्हर न्यूयॉर्कच्या उत्तर भागात ७९ व्या पूर्व रस्त्यावर आपल्या दोन मित्रांसमवेत एका खोलीत राहात होता. त्याने उद्योगाचे व्यवस्थापन ही पदवी संपादन केली होती. त्यामुळे मॅडिसन अव्हेन्यू येथील एका जाहिरात कंपनीमध्ये खूपच चांगली नोकरी मिळाली होती. ऑलिव्हरच्या याच गोष्टीचा आपल्याला तिरस्कार वाटायला हवा असे तिला वाटत होते; परंतु मनी फुटलेला प्रेमाचा अंकुर तिला तिरस्काराची भावना मनी रुजू देत नव्हता. आपण आपल्या ऑलीवर किती प्रेम करतो आहोत याची तिला पूर्ण जाणीव होती.

जेव्हा जेव्हा ते भेटत, तेव्हा तेव्हा तो मनी रंगवलेल्या स्वप्नांबद्दल भरभरून बोलत राही. ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेल्या उपविभागात राहायचे, एक छोटेसे घरकुल उभे करायचे, त्यात आपली चार मुलं अन् आपणा सर्वांची काळजी घेणारी, नोकरी न करणारी प्रेमळ पत्नी असावी. ऑलिव्हरच्या या स्वप्नाची ती खूप खिल्ली उडवायची. ती काहीही वेडेवाकडे बोले, तो फक्त हसायचा. इथेच ती खाली आदळायची. त्याचे ते निरागस पोरसवदा हास्य तिच्या हृदयाची धडकन वाढवायचं. मग ती आपल्या मनाची समजूत घालायची. आपल्याला नाहीतर एक 'सृजनशील' कलावंत

हवा....चित्रकार.....हं, वास्तुशिल्पी....नाहीतर....लेखक....असा 'सृजनशील' हवा. हो, ऑलिव्हर 'सृजनात्मक कला असणारा होता आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा होता...'

साराने मान हलवली व भोवताली पाहिलं. वैवाहिक जीवनाच्या अठरा वर्षांच्या काळात तिच्या ऑलीने आपलं स्वप्न पुरं केलं होतं. परचेस या उपनगरीत एक छोटंसं घर उभं केलं होतं. त्यात त्याची तीन मुलं अन् त्याची लाडकी सारा राहात होते....लाडकी सारा....सौ. सारा ऑलिव्हर वेंडेल वॅटसन.

पुन्हा तिचं मन विवाहपूर्व काळात रमलं.....स्वत:चं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलं पाहिजे याचा आग्रह धरणारी सारा तेव्हा पोरांचं लटांबर मागे लावण्याचा ऑलीचा इरादा ऐकून, तेथून पळून जायची; पण ऑलीच्या दर्शनाने ती विरघळायची. त्याला त्याबद्दल वेडेवाकडे शब्द बोलायची. अशा वेळी ऑलिव्हर शांतपणे तर्कसंगत असे मुद्दे मांडून, त्याच्या मनी असलेल्या मुद्द्यांची योग्यायोग्यता स्पष्ट करून दाखवायचा. यातून त्याच्या मनाची प्रगल्भता, सौम्यता नि नम्रताच प्रतित होई अन् तिला कितीही त्याचा संताप आला तरी तो आपला एक जिवाभावाचा मित्र आहे याची पुसट जाणीव होत असे. कधी कॉफी वा एखादा व्हिस्कीचा ग्लास अथवा दुपारचं जेवण यासाठी ते एखाद्या हॉटेलात जमत असत, तेव्हा आनंदाने आपण काय करतो आहोत याबद्दल तो बोले आणि तिच्या लिखाणाच्या प्रगतीबद्दल विचारणा करीत असे. त्याचे मन म्हणे, 'खरंच, सारा फार चांगली मुलगी आहे.' या मनाच्या ग्वाहीबरोबर त्याला एक प्रश्न पडे, आपली 'सृजनशीलता' सांभाळून विवाहबंधनही सांभाळणं का जमू नये?

बोलता बोलता ती एकदा म्हणाली,....'पुरुषाचं संरक्षक कवच हवं असणाऱ्या स्त्रियांसाठी विवाह आहे. स्वत:ची काळजी घेण्यास मी समर्थ आहे म्हटलं, ऑलिव्हर वॅटसन–' तिनं हे प्रत्यक्षात उतरवलं होतं. तेव्हा ती मुक्तपणे लिखाण करणारी लेखिका अन् एका संग्रहालयाची अंशकालीन व्यवस्थापिका म्हणून नोकरी करू लागली अन् बऱ्यापैकी कमाई होती तिची. कधीमधी तिला जाणवे, करआकारणी, बिल भरणे, जीवनविमा, आरोग्यविमा या सर्व गोष्टी मी एकटी दीर्घकाळ करू शकेन का?

सारा एकदम वास्तवात आली. आज विवाह होऊन अठरा वर्षं झाली, या काळात ती आपल्या ऑलिव्हरवर किती अवलंबून होती? तिच्या प्रत्येक अडचणीची, प्रश्नांची तो आत्यंतिक काळजी वाहत असे. पूर्ण बंदिस्त अशा वेगळ्या जगात ती राहात होती. तिच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असणारा तिचा ऑली तिचे शब्द झेलायला या जगात सदैव तयार होता.

एखादी गोष्ट क्षुल्लक असो अथवा मोठी असो, ती त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून राहायची अन् हे परावलंबित्व तिला फार व्यथित करीत असे. समजा, ऑलीला अचानकपणे काही झालं....तर ती हे सारं पाहू शकेल? आपली मुलं अन् आपण याचं घर त्याच्याशिवाय चालवू शकू? न राहवून ती या शंका त्याच्यासमोर उपस्थित करीत असे. तो फक्त हसून म्हणे, 'काळजी करू नकोस राणी, मी खूप पैसा केला नसला तरी योग्य ते केले आहे.' ती एक या सर्वाला जबाबदार व्यक्ती होती. सर्व प्रकारच्या जीवनविमा पॉलिसी त्यानं घेतल्या आहेत, मॅडिसन अव्हेन्यू येथली जाहिरात कंपनी त्याला सढळ हातानं पाठिंबा देते आहे अन् ही कंपनी त्यानं आपल्या कर्तृत्वानं, तिसऱ्या क्रमांकावर नेऊन ठेवली आहे. देशातल्या तीन जाहिरात कंपन्या हिंक्ले, बरोज, डॉसन यांच्या पंगतीत त्याची ही कंपनी होती. तो स्वत: तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी होता. मोठ्या रकमेची खाती त्यानं कंपनीसाठी मिळवली होती, त्यामुळे कंपनीचा तो अविभाज्य भाग बनला होता. कंपनीचा सर्वात लहान उपाध्यक्ष होता; आणि साराला त्याचा फार अभिमान वाटत होता.पण कधी कधी या साऱ्या तिला बांधून ठेवणाऱ्या गोष्टींमुळे ती उद्‌विग्न होई. ती स्वत:लाच प्रश्न करीत राही....इथे, या छोट्या परचेजमध्ये काय करते आहेस?.....बर्फाची झुरमुर पाहणं आणि मुलं घरी येईपर्यंत त्यांची वाट पाहणं....नाही, हे असं नको व्हायला......लिखाण केलं पाहिजे....

मग ती गोष्ट लिहिण्याचा प्रयत्न करीत राही....पण छे, ती कथा मनात असून लिहिली जात नसे.....गेल्या दोन वर्षांत तिनं लिहिण्याचा प्रयत्न केला.... पण आजवर हाती काहीच लागलं नव्हतं, लिखाणाचे सारे प्रयत्न विफल होत होते. आपल्या एकोणचाळीस वर्षांच्या वाढदिवसादिनी, आपण पुन्हा लिखाणाकडे वळायचं असा पक्का निश्चय तिनं केला होता. असा अतिमहत्त्वाचा निर्णय तिनं घेतला खरा; परंतु एकोणचाळिसावं वर्ष हे फारच वाईट वर्ष गेलं. तेव्हा चाळिशी हे कडेलोटाचं वर्ष होणार याची तिला मनोमन खात्री वाटली अन् ती फारच व्यथित झाली. ऑलिव्हरनं तिच्या चाळिसाव्या वाढदिवसानिमित्त तिला युरोपभ्रमणाच्या प्रवासाला नेलं. ते अगदी दोघेच गेले होते. मोठी दोन्ही मुलं शिबिराला गेली होती, तर धाकटा ७ वर्षांचा सॅम आपल्या आजीकडे राहिला होता. आपल्या छोट्या सॅमला सोडून ती प्रथमच अशी दूर गेली होती. बऱ्याच वर्षांनंतर त्यांच्या विश्वात ते फक्त दोघेच होते...तो अन् ती...साराचा ऑली अन् ऑलिव्हरची सारा. ते पॅरिसला पोहोचले तो स्वर्गाची दारंच जणू खुली झाली...ना गाड्यांची गर्दी...ना मुलांचा गोंधळ...ना पायात घोटाळणारी पाळलेली कुत्री-मांजरी...ना शाळा अथवा हॉस्पिटलसाठी पार्ट्यांची व्यवस्था...काही नाही...कोणी नाही. फक्त ती दोघं आणि युरोपमधील ते चार संस्मरणीय आठवडे...पॅरिस...रोम....तेथून

टस्कॅनीमधून....पुढे इटालियन रिव्हियेरा....मग भाड्याने घेतलेल्या बोटीचा तो तरंगता प्रवास....केन्स् अन् सेंट ट्रॉपेझ याच्यामधून तरंगत वाहणं....मग एझपासून सेंटपॉल्न्डी-व्हेन्स, तेथून कोलंब-डी....येथे मस्त खाना. शेवटचे वावटळीसारखे गरगरून टाकणारे लंडन येथे घालविलेले दिवस. या सर्व प्रवासात सातत्यानं तिनं कागदावर टाचणं करून ठेवली होती. टाचणांच्या जवळजवळ सात वह्या भरल्या होत्या. घरी जाताच कथा, प्रवासवर्णन वगैरे ती लिहिणार होती. ती घरी आली....पण यातून एक अक्षरही ती निर्माण करू शकली नाही....ना कथा....ना निबंध....ना वर्णन....ना कविता....ती तासन्ऽतास शेजारी पडलेल्या वह्या अन् ते टंकलेखन यंत्र यांच्याकडे पाहात राही; पण लिखाणाचं नाव नाही, टंकलेखनातला कागद कोराच्या कोरा. वयाच्या एकेचाळिसाव्या वर्षी तिला वाटलं, आपलं सारं आयुष्य कोरंच्या कोरं राहिलं. ऑलिव्हर हसून तिला म्हणे, 'देवा! सारी, अशी कशी गं तू? माझी तुझी भेट झाल्यापासून आजवर तुझ्यात काहीच कसा बदल झाला नाही?' एका अर्थाने ते खरेच होते; पण ती अन् तिचे टीकाकार तिच्यातला बदल सहजपणे सांगू शकत होते. लाल तांब्याच्या झळाळीचे खांद्यापर्यंत रुळणारे तिचे केस आता तांबूस-भुरे दिसत होते. आणि एखादा-दुसरा जरतारी केस मधून मधून डोकावत होता. साराला नसेल; पण मुलांना मात्र ते अगदी नकोसे वाटत होते. आकाशाची निळाई लेवून जगाकडे पाहणारे तिचे निळे तेजस्वी डोळे आजही आपले तेज राखून होते. साईसारखी मऊ मुलायम कातडी आजही वयाचा हल्ला परतवून तितकीच मुलायम राहिली होती. काही ठिकाणी एखादी-दुसरी रेषा दिसून येत होती. ऑलिव्हर म्हणे, 'या रेषा वेगळीच भावना तुझ्या चेहऱ्यावर दर्शवितात.' तशी सुंदर स्त्रियांत गणना व्हावी अशी ती होती. सडपातळ, कमनीय देहयष्टी, गोंडस हात अन् मिश्किल छटा तिच्या डोळ्यांत सदैव नर्तन करीत असे. या साऱ्यांवर प्रथमपासून ऑलीचे फारच प्रेम होते....तिचे हास्य, तिची तेजस्विता, तिचे धैर्य आणि आपल्या मूल्यांवर असणारी अढळ निष्ठा, मग काय व्हायचे ते होवो! ही वृत्ती. सारेच ऑलिव्हरला आकर्षक वाटत असे. साऱ्यांना ती फारच कर्तव्यकठोर वाटत होती; पण ऑलीला तसे कधीच वाटले नाही. तिचे विचार, विचाराची पद्धत, ते व्यक्त करण्याची पद्धत सारंच ऑलीला गोड वाटे. प्रेमामुळे निर्माण झालेलं आंतरिक नातं, दोघांना एकमेकांबद्दल वाटणारा आदर अन् पराकाष्ठेची आत्मियता, यातून दृढ झालेलं होतं. त्यांच्या रात्री प्रेमाने रंगून जात असत. अन् २० वर्षांच्या काळाचा त्यावर काही परिणामही झाला नव्हता, उलट त्या अधिक पक्व होत होत्या. ते दोघे एकमेकांना अगदी तळहातावरच्या आवळ्याइतके स्पष्टपणे ओळखत होते आणि पूर्णत्वाने समर्पणाची भावना निर्माण झाल्याचे ऑलिव्हरला जाणवत होते.

साराला तिचे विवाहपूर्व, सोहो येथले दिवस आठवले. ऑलिव्हर सतत दोन वर्षं विवाहासाठी तिला पटवत होता, तेव्हा कोठे ती विवाहाला तयार झाली; परंतु जुन्या पद्धतीने विवाह करण्यास तिने नकार दिला. तिच्या आई-वडिलांच्या पौंडरिज येथील घरातच त्यांचा विवाह संपन्न झाला. लग्नाला तिची छोटी बहीण अन् आई-वडील शिकागोहून आले होते. तांबडा लाल रंगाचा पोषाख आणि मोठीच्या मोठी रंगीत टोपी तिनं परिधान केली होती. सारेच म्हणत होते, 'सारा तर चित्रातल्या छोट्या गोंडस पोरीसारखी दिसते. नवरी वाटत नाही!' ऑली अन् सारा आनंदाच्या शिखरावर विराजमान झाले होते. मधुचंद्रासाठी ते बर्म्युडाला गेले होते. हवा अगदी कुंदच होती तेथे; पण बाह्य जगतातलं त्यांना काहीच जाणवत नव्हतं. कारण ते सतत हसत-खेळत, दुपार होईपर्यंत बिछान्यातच राहात. मग संध्याकाळच्या खान्यासाठी हॉटेलच्या जेवणघरात जात; पण खुदखुदत, हसत आपल्याच विश्वात दंग राहून झटकन् आपल्या खोलीवर परत येत, जणू दोन लहान मुलंच होती ती!

मधुचंद्राहून परत येताच हा चंद्र कलेकलेने कमी होऊ लागला. मधुचंद्राची नशा कमी होऊ लागली. कारण सेकंड अव्हेन्यू येथल्या एका छोट्या फ्लॅटमध्ये ते राहू लागले. तरुण सचिव, खानाव्यवस्थापिका आणि बिचारे ब्रह्मचारी अशा लोकांनी संपूर्ण इमारत व्यापली होती आणि अशा मस्तीत जगणाऱ्या लोकांनी सदैव मेजवान्या झोडण्याचे काम चालू ठेवले.

एक दिवस ऑली कामावरून घरी आला तोच त्याला जाणवले की, व्यथित झालेल्या आपल्या लाडक्या साराची कोणी जिवलग मैत्रीण स्वर्गवासी झाली असावी; पण मैत्रीण हे कारण नसून वेगळीच 'चिंता' तिला जाळते आहे. तिची मासिक पाळी चुकली होती. पण या सर्व काळात तिनं अगदी काटेकोरपणे गर्भनिरोधक टोपी वापरली होती-अगदी एखादे व्रत पाळावे तशी. तेव्हा गर्भधारणा होणे शक्यच नव्हते असे तिला ठामपणे वाटत होते; पण छे! कोठेतरी, काहीतरी चुकले होते एवढे मात्र खरे. ती गरोदर होती. सुटका म्हणून गर्भपात करून घेण्याचं तिनं ठरविलं होतं. तिचा हा विचार ऐकून ऑलिव्हर अंतर्बाह्य थरथरला; पण इतक्या लवकर पोरांचं लचांड गळ्यात घालून घ्यायचं या कल्पनेनं तिचा अधिक थरकाप उडाला.

'ऑली....एवढ्यात....पोर....गोतावळा नको रे....मी नोकरी करणार आहे....मला काहीतरी करायचं आहे....कोणीतरी व्हायचं आहे.' ती काकुळतीला येई. यावेळी संपादिका म्हणून एका मासिकात नोकरी मिळवण्याचा तिचा विचार होता. कथा-लिखाणात तिला फारसं यश मिळालं नव्हतं, म्हणून कोलंबिया पदवी विद्यालयात पदवी-नंतर प्राविण्याची पदवी संपादन करण्यासाठी तिनं अर्ज टाकला होता. संग्रहालयाची